**पाहिजेत**
दैनिक अट्टल संकेतसाठी संपूर्ण महाराष्ट्रात वार्ताहर, प्रतिनिधी नेमणे आहेत.
संपर्क - ९६२३४८४४८४

Email : attalsanket2023@gmail.com

# दैनिक अट्टल संकेत
# ATTAL SANKET

RNI No. MAHMAR/2023/87816

■ दैनिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ वर्ष-३ ■ अंक-१३० ■ मंगळवार, दि. १ जुलै २०२५ ■ पाने ४ ■ किंमत २ रूपये

■ Daily ■ Chhatrapati sambhajinagar ■ Vol.3 ■ Issue -130 ■ Tuesday, 1 July 2025 ■ Pages-4 ■ Price- 2/-

## वसंतराव नाईक यांच्या पुतळ्याजवळ नेहमीप्रमाणे अस्वच्छता, पुतळ्याची स्वच्छताही ऐन वेळेवरच


### बंजारा समाजांचे भूषण समजणारे नेते फक्त कडक कपडे अन् जाहिरातबाजीतच व्यस्त

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

हरितक्रांती , पंचायत राज तसेच श्वेतक्रांती व रोजगार हमी योजनेचे जनक वसंतराव नाईक यांची जयंती मोठ्या धुम धडाक्यात सर्वत्र साजरी करण्यात येत आहे. जयंतीसाठी बंजारासमाजामध्ये चैतन्याचे वातावरण दिसून येत आहे. परंतु दुसरीकडे मात्र सिडको येथील वसंतराव नाईक चौकात असलेल्या पुतळ्याकडे मात्र जयंती सोडून इतर दिवशी पाहण्यात कोणालाच रस नाही. महानगरपालिका सध्या अतिक्रमणाची सफाई करीत आहे. म्हणूनच महापुरूषांच्या, समाजभुषणांच्या पुतळ्याच्या साफ सफाईकडे तसेच सुशोभिकरणाकडे लक्ष द्यायला वेळ नाही. पुतळ्याच्या परिसरात आंधुक प्रकाश असतो. प्रसंगी तेथे दारू पिणारे व इतर नागरिकांची बसण्याची व फिरण्याची सोय होत असे.

**३० तारखेला दुपारी १२ वाजेपर्यंत प्रतिनिधीने फटका मारला असता तोपर्यंत तरी परिस्थिती 'जैसे थे'च होती. सिडको चौकातील पुतळ्यावर घाण बसलेलीच..... जयंतीच्या दिवशीच महानायकाच्या दर्शनाला येणाऱ्या हौशा नवश्यांनी तरी इतर दिवशी येवून चौकातील सुशोभिकरणावर लक्ष दिले पाहिजे. पुतळ्यावर प्रकाश पडावा यासाठी लावण्यात आलेले. हॅलोजन बल्ब देखील निकामी आहेत. याचे छायाचित्र अट्टलमत प्रसिद्ध करत आहे.**







**सिडको चौकात असलेल्या वसंतराव नाईक यांच्या पुतळ्याला सुशोभिकरणाचे तर बाराच वाजले आहे. विद्युत कनेक्शन नसलेले हॅलोजन नुसतेच लटकवण्यात आलेले. त्या विद्युत पुरवठाच नाही. शोभेसाठीच लावले आहेत की काय?**

### कालनिर्णयला देखील विसर

हरितक्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांच्या जयंतीचा कालनिर्णयला देखील विसर पडला. त्यामुळेच १ जुलैला जयंतीचा उल्लेख देखील केलेला दिसून येत नाही. काही आवृत्त्यांमध्ये असू शकतो.

## पाच तारखेचा मोर्चा निघणार नाही, सर्वपक्षीय नेत्यांचा निर्णय

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

मागील सरकारमध्ये उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना हिंदी भाषा सक्तीकरणाला पाठिंबा दिला होता. त्यामुळे राज्यात काही दिवसांपासून हिंदी भाषावरुन राजकारण चांगलंच तापल होत. थोड्याच वेळापूर्वी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषद घेऊन हिंदी भाषा सक्तीकरणाचा जी.आर. रद्द केल्याची घोषणा फडणवीस यांनी केली. त्यामुळे सर्वपक्षीय नेत्यांनी पाच तारखेचा मोर्चा रद्द केला. उद्धव ठाकरेंचा काळात घेण्यात आलेला निर्णयाला राज्य सरकारकडून विरोध करण्यात आल्यामुळे मराठी जनतेने देखील फडणवीस सरकारचे आभार मानले आहेत.

देवेंद्र फडणवीस यांनी आज सकाळी महत्वाची बैठक बोलावली होती. या बैठकीत हिंदी भाषा सक्तीकरणाचा जीआर रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे फडणवीस यांनी आपल्या पत्रकार परिषदेत अनेक गौप्यस्फोट करुन, हिंदी भाषेला पाठिंबा कुणाचा होता ? हिंदी भाषेची सक्ती करण्यासाठी नेमका मुद्दा कुणी मांडला? यांसारखी माहिती जनतेसमोर पत्रकार परिषदेतून उघड केली. त्यामुळे मराठी जनतेने फडवीस सरकारचे आभार मानले आहेत. फडणवीस यांनी आपल्या पत्रकार परिषदेतून राज ठाकरे यांनाही प्रश्न केला. हिंदी भाषा सक्तीकरणाला विरोध करण्यापूर्वी उद्धव ठाकरेंना प्रश्न विचारा, हिंदी भाषा शालेय शैक्षणिक वर्षात सामावेश करण्यासाठी मंत्रालयात निर्णय कुणी घेतला होता? त्यामुळे तुम्ही कोणत्या तोंडाने आंदोलन करता असा सवाल फडणवीस यांनी आपल्या पत्रकार परिषदेतून उपस्थित केला. त्यामुळे फडणवीस सरकारच्या पत्रकार परिषदे नंतर मराठी जनतेने सरकारला पाठिंबा दर्शवला.

## बनावट वेबसाईटवरून स्टील खरेदीचा गंडा; एक लाख रुपयांची फसवणूक

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

बांधकामासाठी आवश्यक असलेले स्टील खरेदी करण्यासाठी ऑनलाईन शोध घेत असताना एका बनावट वेबसाईटच्या जाळ्यात अडकून कंपनीच्या व्यवस्थापकाची तब्बल एक लाख रुपयांची फसवणूक झाल्याचा प्रकार समोर आला आहे. सीटीआर मॅन्युफॅक्चरिंग इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीत १६ ते २३ एप्रिल २०२४ या कालावधीत ही घटना घडली. याप्रकरणी उत्तरप्रदेशातील शिवम मिश्रा याच्याविरुद्ध एमआयडीसी सिडको पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अनिलकुमार श्रीलालकुमार वर्मा, जे या कंपनीत वरिष्ठ फायनान्स मॅनेजर म्हणून कार्यरत आहेत, यांनी १६ एप्रिल रोजी स्टीलसाठी इंटरनेटवर शोध घेतला. त्यावेळी 'श्री सिद्धेश्वर इंडस्ट्री' या नावाच्या स्टील पुरवठादार कंपनीचा संदर्भ मिळाला. त्यांनी दिलेल्या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधल्यानंतर स्वत:ला टाटा स्टीलचा वितरक असल्याचे सांगण्यात आले. पुढे १५ लाख १५ हजार रुपयांच्या स्टीलसाठी बील पाठवण्यात आले आणि एक लाख रुपये ॲडव्हान्स मागण्यात आले. वर्मा यांनी २३ एप्रिल रोजी कॅनरा बँकेच्या एका खात्यात एक लाख रुपये पाठवले. मात्र, नंतर स्टीलची कोणतीही डिलिव्हरी आली नाही. आरोपीकडून वारंवार संपर्क करण्याचे प्रयत्न केले, तरी प्रतिसाद मिळाला नाही.

**खरेदी खात्याच्या तपासात फसवणुकीचा उलगडा**

माल पोहोचत नसल्याने वर्मा यांनी प्रत्यक्ष कंपनीशी संपर्क साधला. त्यावेळी खरेदी विभागप्रमुख उन्नी कृष्णन यांनी कोणतीही रक्कम घेतली नसल्याचे सांगितले आणि दिलेले बँक खाते देखील त्यांच्या नावावर नसल्याचे स्पष्ट केले. त्यामुळे हा संपूर्ण बनावट व्यवहार उघडकीस आला. सध्या पोलिसांनी बँक खात्याचा तपशील मिळवून आरोपीचा शोध सुरू केला आहे.

## 'तीसगावमध्ये ग्रामपंचायतीच्या माध्यमातून विकास साधला जाईल'

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

तीसगावच्या खवडा डोंगर परिसरातील जागेवर छत्रपती संभाजीनगर महापालिकेने प्रधानमंत्री आवास योजनेसाठी आराखडा तयार केला आहे. त्या दृष्टीने प्रक्रिया सुरू आहे. मात्र, याला ग्रामस्थांनी विरोध केला. या बाबत सोमवारी (ता. ३०) ग्रामसभा झाली. सरपंच शकुंतला कसुरे अध्यक्षस्थानी होत्या. महापालिकेला जागा न देण्याचा ठराव सभेत पारित झाला. शिवाय उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्याचा निर्णय घेण्यात आला.

ही जागा ताब्यात घेण्यासाठी गत आठवड्यात महापालिकेचे अधिकारी दाखल झाले होते. ग्रामस्थांच्या विरोधामुळे त्यांना परत जावे लागले. त्या दृष्टीने ग्रामसभा झाली. यामध्ये गट क्रमांक २२७/१ मधील ०.७५ जमीन क्षेत्रात महापालिकेचा होणारा सीव्हेज ट्रीटमेंट प्लॅट (एसटीपी), पंतप्रधान आवास योजनेचा प्रकल्प आणि सिडको-म्हाडाच्या हस्तांतरणाविषयी चर्चा झाली.



पंतप्रधान आवास योजना आणि एसटीपी प्लॅटसाठी महापालिकेला जागा देण्यास ग्रामस्थांनी तीव्र विरोध केला. यावेळी तलाठी भारत दुतोंडे, उपसरपंच गणेश बिरंगळ, नागेश कुठारे, अंजन साळवे, संजय जाधव, नितीन जाधव, सुगंध दाभाडे, शिवाजी हिवाळे, फकीरचंद दाभाडे, सोमनाथ महापुरे, सतीश महापुरे, राजेंद्र साळवे, सुनील जोगदंड, कृष्णा साळवे, जितेंद्र दाभाडे, लालचंद कसुरे, ईश्वरसिंग तरैयावाले यांच्यासह ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. घरकुलात हवे भूमिपुत्रांना प्राधान्य अनेक ग्रामस्थांकडे स्वतः ची जागा नसल्याने त्यांना मंजूर घरकुलाचा लाभ मिळाला नाही, असा मुद्दा ईश्वरसिंग तरैयावाले यांनी उपस्थित केला. त्यामुळे घर नाही अशांची नावे घरकुल यादीमध्ये घेऊन मंजूर करावी. भूमिपुत्रांना घरकुलासाठी जागा द्यावी. गावाच्या हद्दीतील जमिनीवर भूमिपुत्रांचा प्रथम अधिकार आहे. त्यामुळे महापालिकेला आवास योजनेसाठी ग्रामपंचायत हद्दीमधील जागा देण्यास ग्रामपंचायतीने विरोध केला.

### हस्तांतरण नकोच....

सिडको वाळूज महानगर आणि म्हाडा प्रशासनाने संपूर्ण विकास कामे केल्याशिवाय प्राधिकरणाकडे परिसराचे हस्तांतरण करू नये, असा ठरावही एकमताने मंजूर करण्यात आला. सिडको आणि म्हाडाने घेतलेल्या जमिनी अद्याप विकसित झाल्या नाही, त्यामुळे त्या परत कराव्या, असेही ठरावात नमूद आहे.

## दुचाकींवर टोल? गडकरींचं स्पष्ट स्पष्टीकरण; अफवांना मिळाला पूर्णविराम

**नवी दिल्ली** – 'दुचाकी वाहनांवर टोल आकारला जाणार' अशा बातम्यांनी देशभरात खळबळ उडवली असतानाच, केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी या संदर्भात स्पष्ट भूमिका घेतली आहे. त्यांनी या बातम्या पूर्णपणे खोट्या व दिशाभूल करणाऱ्या असल्याचं जाहीर करत दुचाकीस्वारांना दिलासा दिला आहे.

गडकरी यांनी त्यांच्या द (पूर्वीचे ट्विटर) अकाउंटवर पोस्ट करत म्हटले आहे की, काही मीडिया हाऊस दुचाकी वाहनांवर टोल लावण्यासंदर्भात खोट्या बातम्या पसरवत आहेत. असा कोणताही प्रस्ताव सरकारसम ेर नाही. दुचाकींना टोल सवलत यापुढेही कायम राहील. अशा प्रकारच्या अपुऱ्या माहितीच्या आधारे बातम्या प्रसिद्ध करणे ही निरोगी पत्रकारितेची ओळख नाही. मी अशा वृत्तांचा निषेध करतो. यासोबतच, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (छकअख) ने देखील यावर अधिकृत निवेदन जारी करून या अफवांना पूर्णविराम दिला आहे.

संपादकीय

# हरितक्रांतीचे जनक वसंतराव नाईक

**वसंतराव** फुलसिंग नाईक हे प्रख्यात कृषीतज्ञ, प्रगतशील शेतकरी व राजनितीज्ञ होते. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी सर्वाधिक काळ विराजमान होते. नाईक यांचा जन्म पुसद जवळील गहुली या छोट्याशा खेड्यातील एका सधन शेतकरी कुटुंबात १ जुलै १९१३ रोजी झाला. वसंतराव नाईक हरितक्रांती , पंचायत राज तसेच श्वेतक्रांती व रोजगार हमी योजनेचे जनक मानले जातात. अन्नदाता शेतकऱ्याच्या सन्मानार्थ आज राज्यात एक जुलै हा दिवस कृषी दिन साजरा केला जातो. हरितक्रांतीचे जनक वसंतराव नाईक यांच्या जयंती निमित्ताने हा दिवस साजरा करण्यात येतो.

कृषीसंस्कृतीचा पुनरूत्थान करीत वसंतराव नाईकांनी देशभरात नावलौकिक मिळिवला. आधुनिक भारतीय शेती आणि शेतकऱ्यांचा त्यांनी मान उंचाविला. ‘आधुनिक कृषीप्रधान भारताचे कृषीसंत’ या शब्दात प्रसिद्ध साहित्यिक व विचारवंत एकनाथराव पवार यांनी वसंतराव नाईक यांचे वर्णन केले आहे. इ.स. १९७२ मधील महाराष्ट्रातील भीषण दुष्काळादरम्यान त्यांनी शेतकऱ्यांसाठी मदतीच्या दूरगामी योजना राबवल्या. महानायक वसंतराव नाईक यांना केवळ शेतकऱ्यांच्या प्रश्नांचीच जाणीव नव्हती तर, दूरगामी स्वरुपाच्या उपाययोजना सुद्धा त्यांनी केल्या. शेती आणि शेतकऱ्यांशी त्यांची नाळ कायम जुळलेली होती. कठीण काळातही क्रांतीकारी कार्य नाईकांनी केले. त्यामुळे त्यांना ‘शेतकऱ्यांचा जाणता राजा’, ‘हरितयोद्धा’ म्हणून संबोधतात. माजी राष्ट्रपती, भारतरत्न प्रणव मुखर्जी यांनी ‘वसंतराव नाईक हे भारत मातेचे थोर सुपूत्र आहेत.‘ या शब्दात नाईकांचा गौरव केला. महानायक वसंतराव नाईक हे एक नाव नसून शाश्वत विकासाची लोकाभिमुख विचारधारा आहे.

**नाईक घराणे** – नाईक घराणे हे भारतीय समाजकारण व राजकारणातील एक प्रचलित घराणे आहे. ’स्वराज्याची पंढरी’ म्हणून ओळख असलेल्या पुसद मतदारसंघावर इ. स. १९५२ पासून नाईक घराण्यानी निर्विवाद विजय संपादन केले आहे. ते गौरराजवंशी असून त्यांचे गोत्र रणसोत क्षत्रिय आहे. गहुली हे खेडे गोरराजवंशी चतुरसिंग नाईक रणसोत यांनी वसविले होते. अखिल बंजारा सम ाजाला स्थिर जीवन प्राप्त करून दिले. त्यामुळे ते बंजारा समाजाचे नाईक म्हणजे पुढारी झाले व त्यांचे आडनाव नाईक असे रूढ झाले. चतुरसिंग नाईकांचा मुलगा फुलसिंग नाईक हा पुढे बहुजन समाजाचा ‘नाईक’ झाला. त्यांची पत्नी हुनकीबाई यांना दोन मुले झाली. राजूसिंग व हाजूसिंग. हाजूसिंग छोटे बाबा या नावाने प्रसिद्ध होते. पुढे त्यांना वसंतराव हे नाव पडले व वसंतराव नाईक म्हणून ओळखले गेले. नाईक घराण्यानी महाराष्ट्राला दोन यशस्वी मुख्यमंत्री दिलेत. अविनाश नाईक, मनोहरराव नाईक व इंद्रनील मनोहर नाईक यांच्यारूपाने मंत्री तर विधान परिषद सदस्य म्हणून निलय नाईक. नाईक यांच्या विकास कामावरून व प्रेरणादायी कर्तृत्वामुळे जनम नसात महानायक वसंतराव नाईक म्हणून आदराने संबोधतात.

**शिक्षण** – वसंतरावांचे प्राथमिक शिक्षण हे विविध खेड्यांमध्ये झाले. पुढे त्यांनी विठोली व अमरावती येथे माध्यमिक शिक्षण घेऊन नागपूरच्या मॉरिस कॉलेजमधून बी.ए. ही पदवी घेतली. विद्यार्थीदशेत त्यांच्यावर जगप्रसिद्ध अमेरिकन विचारवंत डेल कार्नेगी यांच्या विचारांचा प्रभाव पडला. तसेच महाविद्यालयात असताना त्यांची नागपूरमधील प्रख्यात घाटे या ब्राह्मण कुटुंबाशी ओळख झाली. १९४१मध्ये त्यांनी वत्सलाताई घाटे यांच्याशी आंतरजातीय प्रेमविवाह केला. त्यांनी आपली वकीली गोरगरीब, शेतकरी, आदिवासी घटकांच्या हितासाठी केली. त्यामुळे त्यांना सामाजिक बांधिलकी जपणारा वकील म्हणून संबोधले गेले. वत्सलाताई पदवीपर्यंत शिकलेल्या होत्या. त्या वसंतरावांच्या बरोबरीने सम ाजकार्यात सहभागी असत. महिला सक्षमीकरणासाठी महिला संवाद , महिला मेळाव्याच्या माध्यमातून जनजागृती करीत असे.

**कारकीर्द** – वसंतरावांनी कायद्याची पदवी घेऊन पुसद येथे वकीलीस सुरुवात केली. गोरगरिबांचा वकील म्हणून ते वऱ्हाडात ओळखले जायचे. सर्वसामान्यांशी जनसंपर्क वाढत गेला. नंतर ते पुसद कृषिमंडळाचे अध्यक्ष म्हणून निवडले गेले (१९४३-४७). यांशिवाय हरिजन वसतिगृह व राष्ट्रीय वसतिगृहाचे (दिग्रस) ते अध्यक्ष होते. १९४६ मध्ये त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. मध्य प्रदेश राज्याच्या मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालकपदी त्यांची नियुक्ती झाली (१९५१-५२).

ते पुसदच्या नगरपालिकेचे अध्यक्ष म्हणून निवडून आले (१९४६-५२). पहिल्या निवडणुकीत ते मध्य प्रदेश राज्यात महसूल खात्याचे उपमंत्री झाले (१९५२-५६). १९५६ मध्ये राज्यपुनर्रचनेनंतर विदर्भ व मराठवाडा हे प्रदेश मुंबई द्विभाषिक राज्यात समाविष्ट झाल्यानंतर वसंतराव यशवंतरावांच्या मंत्रिमंडळात कृषिमंत्री झाले (१९५७).

त्यानंतर १९६० मध्ये स्वतंत्र महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यानंतर ते प्रथम महसूल मंत्री होते. १९६२ च्या निवडणुकीनंतरही कन्नमवारांच्या मंत्रिमंडळात ते महसूल मंत्री होते; पण कन्नमवारांच्या मृत्यूनंतर ते बहुमताने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले (१९६३). या पदावर त्यांनी १२ वर्षे काम केले.

# लोकशाही मूल्य जपणारे वसंतराव नाईक

**लोकशाही प्रधान भारत देशाने मागील पंच्याहत्तर वर्षात अनेक राजकीय स्थित्यंतरे पाहिली आहेत. या देशातील जनतेला अडाणी, अज्ञानी, भोळीभाबडी समजून वापरण्याची राजकारण्याची खेळी देशातील जनतेनी अनेकदा उधळून लावलेली आहे. देशाचा भौतिक विकास जगाचे लक्ष वेधण्या इतके नक्कीच झालेले आहे. पण भौतिक विकास म्हणजेच देशाचा खरा विकास नाही. भौतिक विकासापलिकडेही बरेच कांही आहे.**

**सध्याचे** घाणेरडे, स्वार्थाने बरबटलेले, ओंघळ, किळसवाणे, नीतिमूल्यहीन राजकारण पाहून अपूरी संसाधने असतांना सुद्धा राज्याला विकासाच्या एका ऊंचीवर नेऊन ठेवणारे, लोकशाहीप्रधान देशात सुडाचे राजकारण करता कामा नये हे आपल्या कृतीतून सिद्ध करणारे हरितक्रांतीचे प्रणेते महाराष्ट्र राज्याचे दिवंगत मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. लोकशाहीची मूल्य रुजवण्यासाठी वसंतराव नाईकांनी त्यांच्या कारकिर्दीत पाडलेल्या पायंड्याची अनेक उदाहरणे आहेत. त्यातल्या त्यात भौतिक विकासाला प्राधान्य देतांना माणूस आणि माणुसकीचा कुठेही बळी जाणार नाही याची त्यांनी विशेष काळजी घेतली. राज्यकारभार करतांना राजकीय शुचिता पाळणे, बदल्याची भावना मनात न ठेवता विरोधकांशी सन्मानाने वागणे, खऱ्या अर्थाने सर्वांना सोबत घेऊन काम करणे. ही त्यांच्या कारभारातील प्रमुख वैशिष्ट्य होती.

वसंतराव नाईक म्हणजे सौजन्यशीलता, सुसंस्कृतपणा, शालीनता, सभ्यपणा, मृदुभाषी व मितभाषी अशा अनेक मानवी गुणांनी बहरलेले व्यक्तिमत्व होते. म्हणूनच त्यांनी विरोधकांच्या मनातही घर करुन होते. त्यांच्या धोरणात लोकाभिमुखता आणि सामान्यातील अतिसामान्य माणसांचे प्रतिबिंब उमटलेले असायचे. गतिमान राज्यकारभार करतांना जनतेच्या विश्वासाला त्यांनी कधी तडा जाऊ दिला नाही. विश्वासाहर्ता त्यांच्या कारभारातील प्राण होता. महाराष्ट्राच्या भूमित कणकणात समृद्धी फुलविण्याची त्यांची जिद्द व ध्येय होते. त्यानुरुपच त्यांनी सव्वा अकरा वर्ष गतिमान शासन चालविले. शेती आणि शेतर्कयांची त्यांनी आपल्या दूरदृष्टी धोरणातून विशेष काळजी घेऊन तसे धोरण राबविले. शेतर्कयांकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोण हा होता की, ’ आमचा शेतकरी हा माणूस आहे आणि माणूस म्हणून जगण्याचा त्याला अधिकार आहे. शेतकरी म्हणजे फाटक्या, मळक्या कपड्यातच असला पाहिजे असे कुठेही लिहिलेले नाही.’ शेतर्कयांच्या जीवनमानात अमूलाग्र बदल व्हावा म्हणून त्यांनी तसे धोरण राबविले. त्यांना गोदडीचा संसार मान्य नव्हता. माझ्या राज्यातील शेतकरी, कष्टकरी वर्गाबरोबरच प्रवाहाबाहेरील दीनदलित, भटके व विमुक्त, शोषित, वंचित, बहुजन वर्गाने लाचारी, दीनता, हीनता सोडून ताठ मानेने जगले पाहिजेत. त्यांनी कुणापुढेही हात पसरवता कामा नये म्हणून तशा विकासाभिमुख योजना राज्यात राबवून जनतेच्या मनात आत्म विश्वास भरला. त्यांच्या पंखाला स्वाभिमानाचे बळ दिले. आपली पूर्ण शक्ती पणाला लावून देशामध्ये त्यांनी महाराष्ट्राला प्रतिष्ठा प्राप्त करुन दिली. राज्याला प्रगतीच्या शिखरावर नेतांना त्यांनी लोकशाहीची मूल्य तेवढ्याच कुशलतेने जपली. विकास म्हणजे केवळ भौतिक सुख सुविधेचा महापुर नव्हे. तर राज्यातील सामाजिक स्वास्थ्य जपणे तेवढेच महत्वाचे आहे. सामाजिक सौदाहार्य, सामाजिक सलोखा या मध्ये कुठेही द्वेषरुपी विषाचा थेंब पडता कामा नये. याची त्यांनी पूर्ण काळजी घेतली.

वसंतराव नाईक जसे एक कर्तबगार, समर्थ शासक होते, तसेच ते मनाने दिलदार होते. त्यामुळे ते अजातशत्रु म्हणून ओळखले जायचे. ते स्व पक्षातील सर्व सहकार्यांना सोबत घेऊन काम करणे आणि विरोधकांनाही विश्वासात घेऊन राज्याचा गाडा समर्थपणे हाकणे ही त्यांची हातोटी होती. शत्रुलाही मित्र बनवण्याचे कसब त्यांच्याकडे होते म्हणूनच त्यांच्या स्वभावातील माणुसकी, स्नेह, आत्मीयतेच्या सागरात सारेच सामावून जायचे. सभागृहात किंवा सभागृहाबाहेर त्यांच्यावर तुटुन पडर्णाया विरोधकांबद्दल कधीही त्यांनी कटुता, द्वेष किंवा सुडाची भावना म नाला स्पर्श करु दिली नाही. शत्रु म्हणून समोर उभे राहिलेल्यांनासुद्धा त्यांनी प्रेमाच्या स्पर्शाने त्यांना जवळ केले. त्यांच्या मनाच्या मोठेपणाची अनेक उदाहरणे आहेत. त्यापैकी सेनापती बापटांचे एक उदाहरण खुप बोलके आहे. एकदा विरोधी पक्षांच्या नेत्यांनी सेनापती बापटांना फुस लावून मुख्यमंत्री वसंतराव नाईक साहेबांच्या वर्षा निवास्थानासमोर उपोषणाला बसवले. नाईक साहेबांनी त्यांच्याशी एवढ्या शालीनतेने व्यवहार केला की, सेनापती बापट मेणासारखे वितळून गेले आणि बाहेर लावलेले आपले आसन नाईक साहेबांच्या घरात घेऊन गेले. नाईकांनी विरोधकांनी रचलेला डाव प्रेमाच्या हत्याराने सहज हानुन पाडले. थोडक्यात सांगायचे म्हणजे, वसंतराव नाईक साहेबांनी विरोधकांचा नेहमीच सन्मान केला. विरोधकांना त्यांनी



कधीही कमी लेखले नाही की, त्यांना नेस्तनाबूद करण्याचे धोरण कधी राबवले नाही. विरोधी पक्ष लोकशाहीचा कणा आहे आणि त्याला इजा पोहोंचता कामा नये याची प्रचिती त्यांनी विरोधकांशी सौजन्यशीलतेचा व्यवहार करुन दिली. विरोधकांना कमजोर करुन लोकशाही टिकवता येत नाही. हे त्यांनी आपल्या व्यवहाराने सिद्ध करुन दाखवले. लोकशाहीची मूल्य कशी जपावीत, सामाजिक स्वास्थ्य उत्तम कसे राहिल याची काळजी कशी घ्यावी, सर्व घटकाला न्याय कसे द्यावे, द्वेष, तिरस्काराला मुठमाती देऊन राज्यकारभार कसा करावा आणि कसे करु नये याचे उत्तम उदाहरण म्हणजे वसंतराव नाईक आहेत. आजचे राज्यकर्ते सुड भावनेने एवढे विकृत झालेले आहेत की, त्यांचे आचरण पाहून किळस येते. आज कोणी मुख्यमंत्र्यांच्या घरासम ोर साधी हनुमान चालिसा वाचतो म्हटले की, त्यांना त्यांच्या घरातून उचलून नेऊन देशद्रोहाचा गुन्हा दाखल करुन थेट तुरुंगात पाठवून स्वतः ची पाठ थोपटून घेतांना दिसतात. किती पराकोटीचा अहंकार आणि सुड भावना आजच्या राज्यकर्त्यांच्या डोक्यात भिणलेली आहे हे सहज लक्षात येते. वसंतराव नाईकांनी सत्तेची नशा डोक्यात न भिनु देता राजकारण करतांना माणूस आणि माणुसकीला विशेष महत्व दिले होते. भेदभाव न करता सर्व घटकांची काळजी घेऊन त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी मनापासून काम केले. कोणाशीही दुजाभाव केला नाही. जेंव्हा राज्यकर्ता संकुचित भावना, धोरण डोक्यात घेऊन बसतो तेंव्हा सर्वच घटकांची परवड होते. भौतिक विकास आवश्यक नव्हे तर तो अनिवार्य आहे. याचे भान त्यांना होते. तरीही त्यांनी भौतिक विकासाबरोबर माणुसकीचाही विकास झाला पाहिजे याबाबतही ते आग्रही होते. म्हणूच त्यांनी राज्यात माणुसकीची पेरणी केली. हे पीक वाढण्यासाठी आपल्यापरीने त्यांनी प्रामाणिक प्रयत्न केले.

विकास म्हणजे केवळ असमतोल भौतिक सुख सुविधेचा महापुर नव्हे. स्वातंत्र्याच्या पंच्याहत्तर वर्षात या देशात सत्ता आणि संपत्तीचे योग्य वाटप झालेले नाही. किंबहुना तशी धोरणे राज्यकर्ते राबवतांना आज दिसत नाहीत. शेतकरी आणि गरीबी ही राजकारण्यांच्या सत्ता संपादनाचे मुख्य साधन आज बनलेली आहेत. भौतिक विकासाबरोबरच या देशाचे सामाजिक स्वास्थ्य जपणे तेवढेच महत्वाचे आहे. सामाजिक सौदाहार्य, सामाजिक सलोखा यामध्ये कुठेही द्वेषरुपी विषाचा थेंब पडता कामा नये. या देशात हजारो जाती आहेत, विभिन्न संस्कृती, अनेक धर्म आहेत. सर्वांच्या हितरक्षणाची जबाबदारी राज्यकर्त्यांची असते. पण आज तसे चित्र दिसत नाही. राज्यकर्तेच सामाजिक सलोखा बिघडवून सत्ता काबीज करण्याची नीति उघडपणे आज राबवतांना दिसतात. हे चित्र बदलले नाही तर एक ना एक दिवस या देशात अराजकता म ाजल्याशिवाय राहणार नाही. दुर्सयांचे पक्ष फोडून त्यांना असली नकलीचे लेबल लावून त्याला सुद्धा निवडणुकीचा विषय बनवला जातो. आजचे राष्ट्रीय स्तरावरील नेते आम्ही संविधानाला किती महत्व देतो हे देशातील जनतेला आणि जगाला दाखवण्यासाठी संविधान कपाळी लावतांना दिसतात. संविधान कपाळी लावण्यासाठी नसून संविधानानुसार राज्यकारभार करुन देशातील प्रत्येक घटकाला खोटे न बोलता सामाजिक न्याय देण्यासाठी आहे. हे नाटकी राजकारण्यांना कोणी सांगायचे ? आजचे नेते एकमेकांची उनीदुनि काढण्यातच आपली सर्व शक्ती खर्च करतांना दिसतात. कुत्रे एकमेकांवर जेवढे तुटून पडत नाहीत, तेवढे आजचे नेते पातळी सोडून वागतांना दिसतात. जनतेनी या गलिच्छ राजकारण्यांपासून काय आदर्श घ्यायचा ?

या सर्व पार्श्वभूमीवर वसंतराव नाईक यांचे समृद्ध विचारांची दीर्घ कारकीर्द विसरुन चालणार नाही. जातीयतेचे विष डोक्यात भरुन वावरर्णाया नेत्यांनी कितीही नाईक साहेबांची यशस्वी कारकीर्द झाकण्याचा प्रयत्न केला तरी आज ना उद्या वसंतराव नाईक साहेबांच्या विचारानेच राज्य आणि देश चालवावे लागेल. जनता बदमाशी जास्त दिवस सहन करीत नाही. काळ कोणालाही दीर्घकाळ क्षमाही करीत नसतो. नीतिमूल्यहीन राजकारण करर्णायांनी ही गोष्ट वेळीच समजूत घेतली पाहिजे. नाईक साहेबांचे राष्ट्रहितकारी, लोकशाही मूल्यवर्धक विचारांची राज्याला नव्हे, तर या देशाला नितांत गरज आहे. खऱ्या अर्थाने सर्वांना सोबत घेऊन सामाजिक न्यायाच्या तत्वांवर राष्ट्र उभा करण्याच्या त्यांच्या विचारांची जपवणूक व संवर्धन करण्याची व ती जनसामान्यांत रुजवण्याची आज नितांत गरज आहे. अशा नेत्यांच्या राष्ट्राला, लोकशाहीला पोषक असर्णाया विचाराला जेवढे बळ दिले जाईल. तेवढी लोकशाही मूल्य जीवंत राहतील. लोकशाहीची मूल्य जीवंत राहिली तरच या देशाची लोकशाही जीवंत राहिल. लोकशाहीचा ढासळत जाणारा पाया सुरक्षित ठेवण्यासाठी वसंतराव नाईक साहेबांच्या विचारांकडे दुर्लक्ष करणे आत्मघात ठरेल. हरितक्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांनी महाराष्ट्राला काय दिले ? हा प्रश्न कोणी विचारला तर त्याचे उत्तर आहे, लोकशाही मजबूत करण्यासाठीचे समृद्ध विचारांचे अक्षय महाधन त्यांनी महाराष्ट्रालाच नव्हे तर देशाला दिलेले आहे. जवळपास सर्वच राजकीय पक्ष आज मलिन झालेले आहेत. नीतिभ्रष्ट झालेले आहेत. तसेच प्रत्येक पक्षातील अधिकांश नेते सत्तेसाठी लाज शरम सोडून वागतांना दिसतात. सकाळी एका पक्षात असलेला नीतिभ्रष्ट नेता दुपारी त्याच पक्षात असेल याची खात्री नसते. दुपारी ज्या पक्षात तो आहे, संध्याकाळी त्याच पक्षात दिसेल याची शाश्वती त्यांच्या घरच्यांनाही नसते. स्वार्थासाठी बेडकासारखे इकडून तिकडे उड्या मारणारे राजकीय बेडकं आज एवढे निर्लज्ज झालेले आहेत की, त्याचे वर्णन करणे अवघड झाले आहे. म्हणून राजकारण्यांची ढासळलेली नीतिमत्ता आणि बिघडलेले चारित्र्य सुधारण्यासाठी, लोकशाहीची मूल्य जपण्यसाठी, सुडाची, बदल्याची भावना नष्ट करण्यासाठी वसंतराव नाईक यांच्या विचाराशिवाय दुसरा कोणताच पर्याय नाही. संविधान आणि लोकशाही वाचवण्याची ताकद त्यांच्या विचारात ठासुन भरलेली आहे. हे कोणालाही नाकारुन चालणार नाही.

**– प्रा. फुलसिंग जाधव, औरंगाबाद**
(सामाजिक कार्यकर्ता
व विचारक) छत्रपती संभाजीनगर

## आरक्षणाचे जनक राजश्री शाहू महाराजांची जयंती ज्ञान संदीप प्राथमिक व माध्यमिक विद्यालय मिसरवाडी येथे उत्साहात



**छत्रपती संभाजीनगर
(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

आज दिनांक २६ जून २०२५ रोजी ज्ञान संदीप शिक्षण संस्था संचलित ज्ञान संदीप प्राथमिक व माध्यमिक विद्यालय मि सरवाडी छत्रपती संभाजी नगर येथे लोकनेते रयतेचे राजे आरक्षणाचे जनक छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात संपन्न झाली.

या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. प्रकाश सोनवणे सचिव श्रीमती .संगीता खिल्लारे यांचे विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक श्री.अभिजीत सोनवणे हे होते प्रमुख पाहुणे व मुख्याध्यापक यांच्या हस्ते सर्वप्रथम राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले .याप्रसंगी शाळेतील विद्यार्थ्यांनी शाहू महाराज यांच्या जीवन कार्याविषयी भाषणे केली त्याचबरोबर प्रमुख पाहुणे प्रा.प्रकाश सोनवणे मुख्याध्यापक श्री.अभिजित सोनवणे व शिक्षक यांनी सुद्धा शाहू महाराज यांच्या कार्याचा गौरव केला .कार्यक्रम ाचे सूत्रसंचालन माध्यमिक शिक्षक श्री किरणकुमार सोनवणे यांनी केले हा कार्यक्रम यशस्वी प्राथमिक पदवीधर शिक्षिका श्रीमती वैशाली बोरुडे अजयकुमार खिल्लारे आनंद सातदिवे विजय आघाव गौतम मकासरे स्वामी जाधव यांनी विशेष परिश्रम घेतले त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांना संस्थेच्या वतीने मिठाई वाटप करण्यात आले व शेवटी अजयकुमार खिल्लारे यांनी सर्वांचे आभार प्रदर्शन केले.

## 'जैन मुनि देख लो, त्याग करना सिख लो'
## उपाध्याय विरंजनसागरजी महाराज यांचे चातुर्मासासाठी आगमन



**छत्रपती संभाजीनगर
(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

प.पु.आचार्य समाधीसम्राट विरागसारजी महाराज यांचे प्रभावक शिष्य प.पु.पटटाचार्य विशुध्दसागरजी महाराज यांचे आज्ञानुवर्ती शिष्य प.पु.उपाध्याय १०८ विरंजनसागरजी महाराज, मुनिश्री विनीशोधसागरजी महाराज, मुनिश्री विसौम्यसागरजी महाराज, प.पु. क्षुल्लिका विशिलाश्री माताजी यांचा ससंघाचे आज सकाळी आगमन झाले.

चातुर्मास श्री.१००८ मल्लीनाथ दिगंबर जैन मंदिर देशमुखनगर,शिवाजीनगर येथे आगमन झाले . उपाध्याय विरंजनसागरजी महाराज ससंघाचे आज सकाळी ८ वाजता राष्ट्रसंत तरूणसागरजी महाराज चौक सेव्हनहिल जालना रोड येथे भव्य स्वागत करण्यात आले. यावेळी समाज बांधवांनी जैन मुनि देख लो, त्याग करना सिख लो, गुरूजी हमारे आये है, नई रोशनी लाये है, जिओ और जिने दो असा जयघोष करत संपुर्ण परिसर धर्ममय झाला होता. यावेळी सकल जैन समाजातील समाज बांधव म ोठया संख्येने उपस्थित होते .

यावेळी महिलांनी केशरी रंगाच्या व चुदडीच्या साडया परिधान केल्या होत्या तर पुरुषांनी पांढरे वस्त्र परिधान केले होते. महिलांनी डोक्यावर कुंभ कलश घेवुन पुढे चालत होत्या. तसेच जैन ध्वज घेवुन भाविक पुढे चालत होते. शोभायात्रेत रथ आकर्षिक करत होता. यामध्ये देवशास्त्र गुरू भगवान मल्लीनाथांचा फोटो शास्त्र व आचार्य समाधीसम्राट विरागसारजी महाराज व आचार्य विशुध्दसागरजी महाराज यांचा भव्य असा फोटो लावण्यात आला होता. उपाध्याय संघाचे सेव्हन हिल, गारखेडा मार्गे देशमुखनगर जैन मंदिरात आगमन झाले यावेळी उपाध्याय महाराज ससघ यांच्या सानिध्यात भगवान मल्लीनाथांचा पंचामृत अभिषेक करण्यात आला. यावेळी शांतीमंत्राचे पठण महाराजजी ने केले. यावेळी सभामंडपाचे उदघाटन संजय फत्तेचंद कासलीवाल परिवाराच्या वतीने करण्यात आले. यावेळी उपाध्याय विरंजनसागरजी महाराज यांनी उदबोधन करतांना सांगीतले की देशमुखनगर समाज बांधवांचा पुण्यकर्माचा उदय असल्यामुळे मी ६७० कि.मी.पदयात्रा करफ्न इथपर्यत आलो आहे. चातुर्मासामध्ये धर्म, संयम, व साधना करफ्न पुण्य मिळवावे असेही सांगीतले.

यावेळी पादपक्षालन मंडपामध्ये गुरू परिवाराच्या वतीने करण्यात आले. सेव्हन हिल येथे सकल जैन समाजाच्या वतीने पाद पक्षालन करण्यात आले. यावेळी देशमुखनगर येथील महिलांनी व नवयुवतींनी सुदंर असे धार्मिक नृत्य सादर करून उपस्थितांचे मने जिंकली. यावेळी ५१ थाळी ठेवुन केशर व दुधाने महाराजांचे पाद पक्षालन करण्यात आले. कार्यकम यशस्वी करण्यासाठी श्री.१००८ मल्लीनाथ दिगंबर जैन मंदिर देशमुखनगर शिवाजीनगर व सकल जैन समाजाच्या बांधवांनी परिश्रम घेतले.

# संघटनेने मांडलेल्या मागण्यांवर लवकरच बैठक आयोजीत करून प्रश्न निकाली काढणार-सतिश चव्हाण,संचालक संचलन

### स्पर्धेचे युग असल्यामुळे महापारेषण कंपनीला स्पर्धेमध्ये उतरावे लागणार - अविनाश निंबाळकर,प्रभारी संचालक प्रकल्प

**छत्रपती संभाजीनगर
(अट्टल संकेत प्रतिनिधी)**



महाराष्ट्र राज्य वीज तांत्रीक कामगार संघटनेच्या वतीने आयोजत कार्यशाळा, सत्कार व निरोप समारंभाचे आयोजन मसिआ सभागृह येथे दि.२८/६/२०२५ रोजी आयोजीत करण्यात आला होता या कार्यक्रमाचे उद्धाटन महापारेषण कंपनीचे संचालक संचलन सतिश चव्हाण यांच्या शुभहस्ते करण्यात आले, याप्रसंगी उद्धाटनपर मार्गदर्शन करतांना महापारेषण कंपनीतील तांत्रीक कामगारांचे प्रश्न व आकृतीबंध आराखड्यामध्ये तांत्रीक कामगारांच्या निर्माण झालेले प्रश्न याबाबत सादर केलेले निवेदन यावर संघटनेसोबत लवकरच मुंबई बैठकीचे आयोजन करून हे प्रश्न सोडविण्यात येतील असे आश्वासन महापारेषण कंपनीचे संचालक संचलन सतिश चव्हाण यांनी केले असल्याची माहिती संघटनेचे सरचिटणीस हाजी सय्यद जहिरोद्दीन यांनी प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकामध्ये दिली आहे.

थोडक्यात या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संघटनेचे अध्यक्ष भाऊसाहेब भाकरे हे होते, मुख्य अतिथी म हापारेषण कंपनीचे प्र.संचालक प्रकल्प अविनाश निंबाळकर,निरोप समारंभाचे सत्कार मुर्ती सय्यद नसीर कादरी,मुख्य अभियंता,महापारेषण कंपनी, प्रमुख पाहूणे अधिक्षक अभियंता आर.पी.चव्हाण, श्रीमती अजंना ठक्कर, कार्यकारी अभियंते व संघटनेचे सरचिटणीस हाजी सय्यद जहिरोद्दीन, उपाध्यक्ष शिरीष इंगोले, अजिज पठाण, नानासाहेब चट्टे, मजहर पठाण,अपसरपाशा सय्यद, उपसरचिटणीस कैलास गौरकर, शेख मुजीब, बी.डी. पाटील, महिला प्रतिनिधी स्मिता अंधारे, एम.एम.बी. विश्वस्त अनिल पुरी, सल्लागार समिती सदस्य आर. पी.थोरात, डी.एन.देवकते, श्रावण कोळनूरकर, ताराचंद कोल्हेमामा, बाह्यस्त्रोत संघटना कार्याध्यक्ष साजेद मियाँ भाई यांची उपस्थिती होती. सर्व मान्यवरांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन संघटनेच्या वतीने सत्कार करण्यात आला, सत्कार मुर्ती मुख्य अभियंता सय्यद नसीर कादरी यांच्या सेवा निवृत्ती निमित्त संघटनेच्या वतीने त्यांना स्मृतिचिन्ह, शाल,पुष्पहार देऊन गौरविण्यात आले. प्रास्ताविकात सरचिटणीस हाजी सय्यद जहिरोद्दीन यांची महापारेषण कंपनी देशातील सर्वात मोठी पारेषण कंपनी असून यशस्वी कंपनी आहे, या कंपनीत काम करणारे तांत्रीक कामगारांचा आकृतीबंध आराखडा कंपनीने लागू केला मात्र यामध्ये तांत्रीक कामगारांतील अनेक हुद्यांवर अन्याय झाला आहे, तांत्रीक कामगार पदोन्नतीपासून वंचीत राहत आहे.

वरील हुद्यांचे पदे कमी झाल्याने खालच्या हुद्यांवरील कर्मर्चायांच्या पदोन्नतीच होणार नाही यामुळे या कर्मर्चायांना शेवटपर्यंत एकाच हुद्यावर काम करून सेवा निवृत्त व्हावे लागणार आहे, यामुळे या आकृतीबंधामध्ये सुधारणा होणे आवश्यक असल्याची मागणी केली, तसेच महावितरण कंपनीमध्ये समांतर वीज पुरवठा करण्यासाठी खासगी कंपन्या परवाना मागत असून दि.२२ जुलै रोजी त्याची वीज नियामक आयोगासमोर सुनावणी होणार आहे, आणि खासगी कंपन्यांना परवाने मिळतील कारण २००३ च्या कायद्यानुसार त्यांना परवाने द्यावे लागणार आहे. परंतू या खासगी कंपन्यांना आपल्या कंपन्यांचा रेडीमेड अॅसेट देण्यात येऊ नये, तसेच महापारेषण कंपनीने त्यांना वीज वहन करण्याची संमती देऊ नये, कारण महापारेषण कंपनीची सिस्टर कंपनी मुख्य ग्राहक ही महावितरण कंपनी आहे आदी मागण्यांचा उहापोह केला.तसेच दि.३० जून रोजी सेवा निवृत्त होणारे मुख्य अभियंता सय्यद नसीर कादरी यांना सेवानिवृत्ती निमित्त भावी आयुष्याच्या शुभेच्छा दिल्या. उद्धाटनपर मार्गदर्शनात संचालक संचलन सतिश चव्हाण पुढे म्हणाले की, महापारेषण कंपनी ही आपली कुटूंब आहे आणि कुटूंब चालवितांना जशी आपणास घरात अडचण येत असते तशा प्रकारे काही अडचणी येतात यामुळे कुटूंबप्रमुख जसा घरातील प्रत्येकाला समान न्याय देऊ शकत नाही तसाच काही प्रकार वरिष्ठांकडून आपल्या कर्मर्चायांना न्याय देतांना होतो, कुणाला काही कमी जास्त होते, यामुळे व्यवस्थापनाचा कुणावर अन्याय करण्याचा उद्देश नसतो, मात्र तरी देखील संघटनेने म ाझ्या निदर्शनास आणुन दिलेले प्रश्नांवर लवकरच तोडगा काढण्याचा प्रयत्न करेल असं सांगितले.

मुख्य अतिथी, प्र.संचालक प्रकल्प अविनाश निंबाळकर यांनी आपल्या भाषणात सांगितले की, म हाराष्ट्र राज्य वीज तांत्रीक कामगार संघटनेच्या यापुर्वीच्या अनेक कार्यक्रमास मी उपस्थित राहिलो आहे, आणि संघटनेचे कार्यक्रम हे उत्कृष्ट आणि भरगच्च अशा उपस्थितीत संपन्न होतात, सध्या स्पर्धेचे युग आहे, आणि या स्पर्धेच्या युगात आपल्या कंपन्यांना उतरावे लागणार आहे, कारण एके काळी बाजारामध्ये उंचीवर असणारी मोबाईल कंपनी बी.एस.एन.एल.ने त्यांच्या सेवेत सुधारणा न केल्यामुळे आज कोणत्या स्थानावर आहे आपण बघतो, मोबाईल हॅण्डसेट निर्माण करणारी नोकिया कंपनीने त्यांच्यात बदल न केल्यामुळे बाजारातून हद्दपार झाली आहे, या उदाहरणांसह आपणास देखील स्पर्धेत टिकायचे असेल तर स्पर्धेत उतरून काम करून दाखवावे लागेल, आपला तांत्रीक कामगार हा कंपनीचा पाया आहे आणि त्यांच्या कामामुळेच कंपनी आज शिखरावर आहे यामुळे तांत्रीक कामगारांतील कौसल्य वाखानण्यासारखे आहे आणि यामुळे आपण कोणत्याही संकटास तोंड देऊ शकतो अशी आशा व्यक्त केली.

सत्कारमुर्ती मुख्य अभियंता सय्यद नसीर कादरी यांनी सत्कारास उत्तर देतांना प्रथमता संघटनेचे आभार व्यक्त केले, आणि माझ्या सेवा निवृत्तीनिमित्त संघटनेने या कार्यक्रमाचे आयोजन करून मला जो मान दिला त्याद्दल आभार व्यक्त केले मी जरी सेवा निवृत्त होत असलो तरी मी या संघटनेशी कधीही नाते तोडणार नाही, या संघटनेसोबत माझे अनेक वर्षाचें संबध आहेत, यामुळे संघटनेने माझ्यावर प्रेम केले त्याबद्दल मी हे आयुष्यात कधीही विसरणार नाही असे आभार व्यक्त केले. अध्यक्षीय भाषण कें.अध्यक्ष भाऊसाहेब भाकरे यांनी केले,

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन संघटनेचे रमेश शिंदे यांनी केले, आभार प्रदर्शन कार्यक्रमाचे संयोजक तथा उपाध्यक्ष अजिज पठाण यांनी मानले, कार्यक्रम यशस्वीतेसाठी संघटनेचे छत्रपती संभाजीनगर महावितरण महापारेषण कंपनीचे प्रादेशिक,झोन, सर्कल,विभागीय पदाधिकारी आणि सभासद यांनी परिश्रम घेतले.

# धर्माबाद येथे जल जीवन मिशन अंतर्गत 'स्रोत बळकटीकरण व शाश्वतीकरण' विषयक दोन दिवसीय प्रशिक्षण संपन्न



**धर्माबाद (जि. नांदेड)**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

जल जीवन मिशन अंतर्गत 'स्रोत बळकटीकरण व शाश्वतीकरण' या विषयावर आधारित दोन दिवसीय अनिवासी प्रात्यक्षिक प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

हा कार्यक्रम जिल्हा परिषद नांदेड व के.आर.सी. टेक्नोस्पर्ट रुरल डेव्हलपमेंट ट्रस्ट परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने यशस्वीरित्या पार पडला. प्रशिक्षणामध्ये जल जीवन मिशनची सविस्तर माहिती व जलस्रोतांचे परीक्षण या महत्त्वाच्या बाबींवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. हे प्रशिक्षण विविध सत्रांमध्ये पीपीटी सादरीकरण तसेच खेळ व प्रात्यक्षिके यांच्या माध्यमातून घेण्यात आले. कार्यक्रमात प्रवीण प्रशिक्षक श्री. विलास आठवले, मनोज मोहरील, राधेश्याम राजपूत, शीलवंत धुळे, यांनी विषयाचे प्रभावी सादरीकरण केले. या प्रशिक्षण सत्रास गट समन्वयक क्रांतीदीप थोरमोठे (पं. स. धर्माबाद) यांनी उपस्थित राहून प्रशिक्षणार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनामध्ये टेक्नोस्पर्ट ग्राम विकास प्रतिष्ठानचे सचिव श्री. शैलेश सिसोदिया सर यांनी महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडली. तर संपूर्ण प्रशिक्षणाचे नियोजन प्रशिक्षण समन्वयक पांडुरंग हुलेकर, आकाश काशीद, आदेश धुळे, वरून पडघने, सुमेध परघने, अभिषेक अपशिंदे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. हा प्रशिक्षण कार्यक्रम स्थानिक विकास व जलस्रोत शाश्वतीकरणासाठी प्रभावी पाऊल ठरला असून उपस्थित प्रशिक्षणार्थ्यांकडून याला सकारात्मक प्रतिसाद मिळाला.

# रिप.गटाधिशानी बळ नसताना स्वबळाचा लपंडावाचा खेळ बंद करावा- नारायण बागडे

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या लग्नाची अजुन पत्रिका पण निघाली नाही रिपब्लिकन गटाधिश आतापासूनच गुडघ्याला बाशिंग बांधून बसले आहेत लग्नात वऱ्हाडी किती येतील हे माहीत असूनही बळ नसताना स्वबळाचा लपंडावाचा खेळ सुरू झाला आहे हे बंद करावा असे आवाहन आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चा चे राष्ट्रीय अध्यक्ष नारायण बागडे यांनी माध्यमांशी संवाद साधताना बोलत होते.



स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या खरा हक्कदार हा चळवळीचा कार्यकर्त्या आहे त्यांचे राजकीय पुनर्वसन करणे समाजाचे आणि नेत्यांचे कर्तव्य आहे याची जाणीव न करता आपल्या सोईचे राजकारण कसे करता येईल या मध्ये रमलेल्यांना आपले सोडून दुसऱ्याला मदत कशी होईल यांच्यी चिंता जास्त आहे. ५२ पत्तच्या खेळ तरी बरा कम से कम जोकर ला तरी संधी मिळते परंतु या बावन रिपब्लिकन गटांचा नेत्यांच्या खेळात जमिनीचा खऱ्याखुऱ्या कार्यकर्त्यांना संधी मिळत नाही हे मोठे दुर्दैव आहे. २६ जुन छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त कार्यकर्त्यां मनपा भेजो अभियान कोल्हापूर येथून प्रारंभ. आंबेडकरी मतदानाचे विभाजन करून दुसऱ्यांच्या ओंजळीला म जबूत करण्या ऐवजी कार्यकर्त्यांच्या पदरात पाडून घेण्यासाठी पुरोगामी असो कि प्रतिगामी असो या पक्षा सोबत हात मिळवून राजकीय वाटा किती मिळेल याचा विचार केलेला कधी हि बरा हिच खरी पावती आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांना देवून त्यांचे राजकीय पुनर्वसन करणे समाजाचे आणि नेत्यांचे कर्तव्य आहे असे मत बागडे यांनी व्यक्त केले.

# ग्रामपंचायत स्तरावरील भागधारकांसाठी पाणीपुरवठा योजनेचे स्त्रोत बळकटीकरण व शाश्वतीकरण प्रशिक्षण

**भोकर (जि. नांदेड)**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

जल जीवन मिशन अंतर्गत 'स्रोत बळकटीकरण व शाश्वतीकरण' या विषयावर आधारित दोन दिवसीय अनिवासी प्रात्यक्षिक प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. हा कार्यक्रम जिल्हा परिषद नांदेड व के.आर.सी. टेक्नोस्पर्ट रुरल डेव्हलपमेंट ट्रस्ट परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने यशस्वीरित्या पार पडला. प्रशिक्षणामध्ये जल जीवन मिशनची सविस्तर माहिती व जलस्रोतांचे परीक्षण या महत्त्वाच्या बाबींवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. हे प्रशिक्षण विविध सत्रांमध्ये पीपीटी सादरीकरण तसेच खेळ व प्रात्यक्षिके यांच्या माध्यमातून घेण्यात आले. कार्यक्रमात प्रवीण प्रशिक्षक श्री. विलास आठवले, मनोज मोहरील, राधेश्याम राजपूत, शीलवंत धुळे, यांनी



विषयाचे प्रभावी सादरीकरण केले. या प्रशिक्षण सत्र गटविकास अधिकारी माधव एन केंद्रे (पं. स. भोकर) यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनामध्ये टेक्नोस्पर्ट ग्राम विकास प्रतिष्ठानचे सचिव श्री. शैलेश सिसोदिया सर यांनी महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडली. तर संपूर्ण प्रशिक्षणाचे नियोजन प्रशिक्षण समन्वयक पांडुरंग हुलेकर, आकाश काशीद, आदेश धुळे, वरून पडघने, सुमेध परघने, अभिषेक अपशिंदे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. हा प्रशिक्षण कार्यक्रम स्थानिक विकास व जलस्रोत शाश्वतीकरणासाठी प्रभावी पाऊल ठरला असून उपस्थित प्रशिक्षणार्थ्यांकडून याला सकारात्मक प्रतिसाद मिळाला.

# महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलच्या वैद्यकीय मेडिकल निग्लीजन्स समितीवर डॉ. उज्वला दहीफळे (कराड )यांची नियुक्ती

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

जिल्ह्यातील वैद्यकीय मेडिकल निगलिजन्स संबंधित प्रकरणांवर चौकशी करण्यासाठी स्थापन करण्यात येणाऱ्या समितीवर महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलच्या वतीने डॉ.उज्वला दहिफळे (कराड) यांची प्रतिनिधी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती कौन्सिलचे प्रशासक डॉ. विंकी रुघवानी यांच्या आदेशानुसार करण्यात आली असून, यासंदर्भातील अधिकृत पत्र महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल, मुंबई यांनी २७ जून २०२५ रोजी जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर यांना पाठवले आहे.



सन २०१० मधील शासन निर्णयानुसार, जिल्हा स्तरावर वैद्यकीय निष्काळजीच्या तक्रारींवर सुनावणी घेण्यासाठी एक समिती स्थापन करणे बंधनकारक करण्यात आले आहे. या समितीत महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलचा एक प्रतिनिधी असणे अनिवार्य आहे. या निर्णयानुसार आता डॉ. उज्वला दहीफळे ( कराड )या समितीमध्ये कौन्सिलच्या प्रतिनिधी म्हणून सहभागी होतील. त्या सर्व बैठका व सुनावणी प्रक्रियेत सहभागी राहून वैद्यकीय निष्काळजीप्रकरणांच्या चौकशीस हातभार लावतील. या चौकशी समितीमुळे वैद्यकीय क्षेत्रातील पारदर्शकता, जबाबदारी आणि रुग्णांचे अधिकार अबाधित राहतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# शाहू महाराजांच्या कार्य कार्य सामाजिक न्यायाशी संबंधित होते - एल.डी. ताटू



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

शाहू महाराज सामाजिक न्यायाचे पुरस्कर्ते सामाजिक कार्यकर्ते एलडी ताटू यांचे प्रतिपादन छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी) पुंडलिक नगर येथील शिवराणा सार्वजनिक वाचनालय येथे शिवराणा सेवा संघ व वाचनालय वतीने राजश्री शाहू महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली वाचनालयाचे संस्थापक व ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते यांनी ताटू यांनी शाहू महाराजांच्या कार्य कार्य सामाजिक न्यायाशी संबंधित होते असे प्रतिपादन केले आपला भाषणात एल.डी. ताटू यांनी सांगितले. शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात आरक्षण लागू केले त्याचा लाभ वंचित घटकांना झाला त्यांनी अंधश्रद्धेवर प्रहार केले त्यांनी शेतीच्या विकासासाठी राधानगरी येथे धरण बांधले एक सुतगिरणी सुरू केली शाहू महाराजाकडून सर्वांनी प्रेरणा घेतली पाहिजे अशी आव्हान ताटू यांनी केले. पारंबी कर्नाटकातील एक ज्येष्ठ नागरिक कोंडीबा बेबरेकर यांच्या हस्ते शाहू महाराजांच्या प्रतिमेस पूर्वा पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक , प्रकाशक - श्री. रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५ ए , सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर , सिडको, औरंगाबाद (महा.) - ४३१००५ येथे छापून शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७, सिडको पोलीस स्टेशन जवळ, औरंगाबाद (महा.)- ४३१००३ येथे प्रसिध्द केले.

• संपादक : रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल • मो. 7588166496 • Email : attalsanket2023@gmail.com • RNI No. MAHMAR/2023/87816

This Daily Printed, Published and Owned by RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL Printed at Mansi Printers, Plot No. 45 A, Service Industry Sector, Aurangabad (M.S.)- 431005 and Published at Shop No. 3, Keshardeep Complex, N-7, Near Cidco Police Station, Aurangabad (M.S.)- 431003

• Editor : RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL • मो. 7588166496 • Email : attalsanket2023@gmail.com • RNI No. MAHMAR/2023/87816

# इंडियन मेडिकल असोसिएशनचा लोकाभिमुख प्रवास सुरूच...

# समाजहितासाठी वैद्यकीय व्यासपीठ थेट समाजात पोहोचतेय

## ‘इंडियन मेडिकल असोसिएशन’चा सामाजिक प्रकल्प ‘आओ गाव चले’ यशस्वीरित्या राबविला

**मुरमा, ता. पैठण (जि. छ. संभाजीनगर)– इंडियन मेडिकल असोसिएशन , छत्रपती संभाजीनगर शाखेने ’आओ गाव चले’ या सामाजिक उपक्रमांतर्गत मुरमा या दुर्गम गावात भव्य आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करून आरोग्य सेवेचा हात गावकऱ्यांपर्यंत पोहोचवला. ६०० हून अधिक रुग्णांची विविध तज्ज्ञ डॉक्टरांनी तपासणी केली. समाजासाठी आरोग्यदूत होण्याची भूमिका खचअ यशस्वीरित्या पार पाडत आहे. हिमोग्लोबिन तपासणी शिबिर, ग्रामीण आरोग्य जागृती, आशा कार्यकर्त्यांसाठी तणाव व्यवस्थापन, घंटागाडी कामगारांसाठी तपासणी, बालिकाश्रमात आरोग्य शिबिर, वृद्धाश्रमात सेवा आणि अवयवदान जनजागृती अशा विविध उपक्रमांमुळे इंडियन मेडिकल असोसिएशन समाजाशी एकात्मतेने काम करत आहे.**







### उपक्रमातून वैद्यकीय सेवा

‘आरोग्य ही फक्त डॉक्टरांची नाही, तर संपूर्ण समाजाची जबाबदारी आहे. IMAचे काम आता सभागृहाच्या भिंतींआत नाही, तर समाजाच्या हृदयात घडत आहे. गावागावात जाऊन जनतेशी थेट संवाद साधणे हेच आमचे खरे यश आहे. ’आओ गाव चले’ या उपक्रमातून आम्ही वैद्यकीय सेवा गावकऱ्यांच्या दारात नेतोय. डॉक्टरांमध्ये सेवा भाव जागवून ग्रामीण आरोग्याचे खरे चित्र बदलण्याचा आमचा संकल्प आहे. मुरमा गावातील नागरिकांचा प्रतिसाद अतिशय प्रेरणादायी होता. समाजाच्या आशा–अपेक्षा पेलण्याचे बळ आम्हाला हे उपक्रम देतात.’

- IMA **अध्यक्ष डॉ. अनुपम टाकळकर.**

### सामाजिक बांधिलकी

IMA ने सामाजिक बांधिलकी चांगली जपलिये. ’आओ गाव चले’सारख्या प्रकल्पांमुळे ग्रामीण आरोग्यसेवा बळकट होते आहे. माझ्या मतदारसंघातील प्रत्येक गावात असे उपक्रम घडावे ही माझी इच्छा आहे. डॉक्टरांसाठी नर्सिंग होम अधिनियमाच्या अडचणी सोडवण्याचे आश्वासन मी देतो. माझ्या मतदारसंघात पाणी, रस्ते, आरोग्य अशा सर्व मूलभूत सुविधा मी पोहोचवल्या आहेत. मुरमा गावात लवकरच गोदावरीचे पाणी येणार आहे ही आनंदाची बातमी आहे. गेल्या निवडणुकीत ७५% मतदान झाले; आता उर्वरित २५% मतदारांनीही पुढे यावे.’

**– खासदार संदीपान भुमरे**

### ‘तंबाखू छोडो – जीवन जोड़ो’

या शिबिराच्या प्रारंभी सर्व डॉक्टरांनी गावात फिरून जनजागृती फेरी काढली. हातात प्लॅकार्डसब आणि ‘तंबाखू छोडो – जीवन जोड़ो‘, ‘स्वस्थ गाव, समृद्ध गाव‘ अशा घोषणांनी संपूर्ण मुरमा गाव दुमदुमून गेला. आरोग्याबाबतची उत्सुकता निर्माण झाली आणि वातावरण प्रफुल्लित झाले. संपूर्ण गावात उत्सवाचे स्वरूप निर्माण झाले होते.

**– पाचोडचे सरपंच श्री. शिवराज भुमरे**

### गाव आरोग्यदृष्ट्या बळकट होईल

‘आयएमएचे उपक्रम म्हणजे आमच्या गावात आलेले वैद्यकीय देवदूत आहेत. इतक्या तज्ञ डॉक्टरांनी आमच्या मुरमा गावात सेवा दिली याचा आम्हाला अभिमान आहे. या उपक्रमामुळे आमचं गाव आरोग्यदृष्ट्या बळकट होईल, याची खात्री वाटते.’

**– डॉ. यशवंत गाडे**

### मुरमा गावातील जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद

‘ग्रामीण आरोग्य सेवा देताना खऱ्या गरजा समजतात. डॉक्टर आणि समाज यांच्यातला दुवा हे शिबिर निर्माण करत आहे.’ ‘ग्रामीण भागात सेवा देणे ही खरी वैद्यकीय जबाबदारी आहे. या गावातील मुलांचा उत्साह पाहून या गावातून किमान १५ डॉक्टर्स बनतील असा विश्वास डॉ लक्कास यांनी व्यक्त केला. याही पुढे आम्ही या गावात येऊ असा शब्द त्यांनी दिला. ‘मुरमा गावातील जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद मन हेलावणारा होता. हे भव्य शिबिर आयोजित करून रुग्णतापासणी करू दिल्याबद्दल गावकऱ्यांचे आभार.

आजच्या आओ गांव चले प्रोजेक्ट समन्वयक डॉ. विनोद चावरे म्हणाले: ‘मुरमा गावात इतका मोठा वैद्यकीय ताफा पोहोचणे ही ऐतिहासिक गोष्ट आहे. या उपक्रमामागे डॉक्टरांचा सेवाभाव आणि संघटनशक्ती आहे. गावकऱ्यांनी प्रचंड संख्येने सहभाग घेतल्याने आमचा उत्साह द्विगुणित झाला. पुढील काळात अशाच उपक्रमांची मालिका अधिक गावे आणि विभागांमध्ये राबवणार आहोत. IMA च्या उपक्रमामुळे वैद्यकीय सेवा समाजाच्या दारापर्यंत पोहचत आहे. ’आओ गाव चले’ हा उपक्रम म्हणजे खऱ्या अर्थाने समाजासाठी उभारलेला आरोग्य सेतु आहे.

### प्रमुख सहभागी डॉक्टर

डॉ. यशवंत गाडे, डॉ. अनुपम टाकळकर, डॉ. योगेश लक्कस, डॉ. अंजली गाडे, डॉ. असावरी टाकळकर, डॉ. गितेश दळवी, डॉ. रश्मी दळवी, डॉ. मृत्युञ्जय बिलगी, डॉ. दत्तात्रय कदम, डॉ. राघवेंद्र चाकूरकर, डॉ दिपक चावरे, डॉ रामेश्वर हजारे, डॉ सोहेल शेख, डॉ. सुधीर केळकर, डॉ भगीरथ कटरे. – डॉ. गितेश दळवी यांनी प्रास्ताविक केले तर डॉ. योगेश लक्कस आय एम ए सचिव यांनी सूत्रसंचालन केले.

# वाणिज्य व व्यवस्थापन विषयातील करिअरच्या संधी

वाणिज्य व व्यवस्थापन एकमेकांशी जोडलेले असून, विद्यार्थी केवळ नौकरीसाठी नाही, तर सम ाजातील आर्थिक शिस्त व विकासासाठी देखील हे विषय महत्त्वपूर्ण ठरतात. हे विषय एक चांगले उद्योजक, प्रभावी व्यवस्थापक, आणि जबाबदार नागरिक घडवतात. वाणिज्य व व्यावस्थापन (Commerce and Management) या विषयाचे महत्व खूप व्यापक आणि सर्वांगीण आहे, कारण हे विषय केवळ आर्थिक व्यवहारांपुरते मर्यादित नाहीत, तर समाज, उद्योग, आणि देशाच्या आर्थिक प्रगतीम ध्ये देखील मोलाची भूमिका बजावतात. या विषयात विद्यार्थी लेखापाल होण्यापासून CA, CS, CWA ते उद्योजक बनण्यापर्यंत विविध ध्येय निश्चित करू शकतात. आज कुठलाही व्यवसाय असा नाही कि जेथे लेखापाल ची गरज नाही. अलीकडील काळात तर बँक, विमा कंपन्या, हॉस्पिटल्स , हॉटेल्स इ. सेवा क्षेत्रात नौकरी च्या भरपूर संधी आहेत. शेअर मार्केट मध्ये देखील अनंत संधी आहेत, आर्थिक नियोजन करणारा – CFP (Certified Financial Planner), वित्तीय विश्लेषक – CFA (Certified Financial Analyst), आर्थिक जोखीम व्यवस्थापक – FRM (Financial Risk Manager), आर्थिक/वित्तीय सल्लागार – F$inancial Advisor हे सर्टिफिकेट कोर्सेस करून विद्यार्थीसाठी पुढे BSE (Bombay Stock Exchange), NSE (National Stock Exchange) SEBI (S>ecurities Exchange Board of India), NISM (N>ational Institute of S>ecurities Market) तसेच अनेक इन्व्हेस्टम ेंट कंपनी मध्ये देखील नौकरी च्या संधी आहेत. विषयाचा सखोल अभ्यास केल्यास विद्यार्थी विदेशात देखील चांगली नौकरी मिळवू शकतो, त्यामध्ये चड (वेगवेगळ्या विषयात मास्टर्स), CPA (Certified Public Accountant), CIMA (Certified Institute of Management Accountant) इत्यादी.

वाणिज्य व व्यावस्थापन (ऊाशीलश रपव चरपरसशाशपीं) या क्षेत्रात शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी विविध क्षेत्रांमध्ये अनेक करिअरच्या संधी उपलब्धआहेत. खालील काही प्रमुख संधी आणि क्षेत्रांची माहिती दिली आहे:

**१. लेखा व वित्त –**

चार्टर्ड अकाउंटंट )
कंपनी सेक्रेटरी
कॉस्ट अँड मॅनेजमेंट अकाउंटंट
वित्तीय सल्लागार
बँकिंग क्षेत्रात अधिकारी पदे
इन्व्हेस्टमेंट बँकिंग

२. व्यवस्थापन व प्रशासन :

MBA (विशेषतः HR, )
प्रोजेक्ट मॅनेजर
बिझनेस डेव्हलपमेंट मॅनेजर
ऑपरेशन्स मॅनेजर
स्टार्टअप किंवा उद्योजकता व्यवस्थापन
सल्लागार विविध उद्योगांच्या धोरणांवर सल्ला देणे.

**३. बँकिंग व विमा :**

बँकिंग अधिकारी (PO, Clerk - IBPS>/SBI)
विमा सल्लागार (LIC, ICICI, H$DF$C Life)
क्रेडिट ॲनालिस्ट
फायनान्शियल सर्व्हिसेस

**४. कर व कायदा :**

टॅक्स कन्सल्टंट म्हणून स्वतः च ऑफिस सूर शकतात

जीएसटी – GS>T कन्सल्टंट म्हणून स्वतः चा व्यावसाय करू शकतात

एलएलबी – LLB करून कॉर्पोरेट लॉ मधील संधी अतंरराष्टीय कायदा व्यवस्थांपनमधील नौकरीच्या संधी

**५. ई–कॉमर्स व डिजिटल मार्केटिंग:**

डिजिटल मार्केटिंग एक्झिक्युटिव्ह
सोशल मेडिया मॅनेजर
ई–कॉमर्स ऑपरेशन्स मॅनेजर
कंटेंट मार्केटिंग

६. शिक्षण व संशोधन:

B.Ed./M.Ed. करून शिक्षक होणे

NET/SET पास करून प्राध्यापक होणे/लेक्चररशिप करणे

पीएच.डी. करून संशोधन क्षेत्र निवडणे

स्वतः च्या मालकीचे खासगी क्लासेस/शिकवणी चालवणे

**७. नवीन युगातील संधी:**

डिजिटल मार्केटिंग
Data Analytics / Business Analytics
E-commerce Management
Financial Technology (FinTech)
Sustainability & ESG Consulting

**८. इतर व्यावसायिक संधी:**

सरकारी नोकऱ्या (MPSC, UPSC)
लॉजिस्टिक्स व सप्लाय चेन मॅनेजमेंट
ट्रेवल अँड टुरिझम मॅनेजमेंट
हॉटेल मॅनेजमेंट

**९. विदेशातील संधी:**

- MS in F$inance, Marketing, Suly Chain, etc.
- CPA (Certified Public Accountant)
- CIMA (Certified Institute of Management Accountant)
- 1-year MBA or Master's in Management/F$inance

विदेशात शिक्षण घेताना विद्यार्थीना विविध प्रकारच्या स्कॉलरशिप सुद्धा मिळतात.

- Chevening (UK)
- Erasmus Mundus (EU)
- Fulbright (USA)
- DAAD (Germany)

**१०. उदयोजक होण्याची खूप मोठी संधी:**

छत्रपती संभाजीनगर शहर हे अशिया खंडातील वेगाने वाढणारे शहर म्हणून ओळखले जाते. या शहराम ध्ये छोटे – मोठे जवळजवळ ६ हजार उद्योग आहेत. २००९ पासून सुरु झालेल्या बिडकीन–शेंद्रा DMIC (Delhi- Mumbai Industrial Corridor) प्रकल्पामुळे पंचतारांकित आणि बहुराष्ट्रीय कंपन्या या शहरात येत आहेत, यामुळे नवीन रोजगारच्या संधी उपलब्ध होणार आहेत. विद्यार्थ्यांना या विषयाच शिक्षण घेत असताना चांगलं व्यवस्थापण कौशल्य कस विकसित करावं आणि नेतृत्व गुण कसा वृद्धीगंत करावं याच शिक्षण दिल्या जात, तसेच यासोबत संघटन आणि समन्वय चे धडे देखील दिले जातात.

बदलत्या माहिती व तंत्रज्ञान सोबत वित्त नियोजन आणि व्यवस्थापन कस करावं? उद्योग उभा केल्यानंतर वस्तू आणि सेवांच मार्केटिंग कस करावं? कठीण परिस्थितीमध्ये व्यवसाय कसा पुढे घेऊन जायचा इ. अशा अनेक प्रकारच ज्ञान या विषयामध्ये दिल्या जात म्हणून एक यशस्वी उदयोजक बनण्याचं स्वप्न हा विषय घेऊन पूर्ण होऊल. स्वप्ने पाहणाऱ्यांची खूपच गर्दी आहे, पण ते साकार करणारेच खरे उद्योजक असतात.

**– प्रा. डॉ. अविनाश चांगदेव धोत्रे**
वाणिज्य व व्यवस्थापन विभाग, देवगिरी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर.

# नीट-२०२५ च्या काठिण्य पातळीला भेदत ‘मोटेगावकर सरांचे RCC महाराष्ट्रात टॉप

## ५५० पेक्षा अधिक गुण घेणारे ७२ विद्यार्थी, ५०० पेक्षा अधिक गुण घेणारे तब्बल ३६३ विद्यार्थी

**लातूर/नांदेड**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

डॉक्टर घडविणारी फॅक्टरी म्हणून सर्वत्र नावलौकिक असलेल्या प्रा. शिवराज मोटेगावकर सर संचलित आरसीसी पॅटर्नच्या विद्यार्थ्यांनी नुकत्याच जाहीर झालेल्या नीट-२०२५ च्या निकालात प्रतिवर्षीप्रमाणे यंदाही यशाची घोडदौड कायम ठेवली आहे. यामध्ये कन्हैया खंदाडे याने ऑल इंडिया रँक २०३ घेऊन ६३२ गुण ,आदिनाथ कुरुडे (AIR 235) ६३० गुण,आर्यन मेहरे (AIR 806) ६१० गुण,सोहन लोकरे (AIR 1005) ६०६ गुण,रोहित मते (AIR 1042) ६०५ गुण, रविकिरण पांडे (AIR1094) ६०४ गुण मिळिवत आरसीसी मधून प्रथम आले. एवढेच न्हवे तर या निकालात आरसीसीच्या ७२ विद्यार्थ्यांनी ५५० पेक्षा अधिक गुण तर ३६३ विद्यार्थ्यांनी ५०० पेक्षा अधिक गुण प्राप्त केले आहेत. विशेष म्हणजे नीट-२०२५ चा पेपर हा अत्यंत अवघड आणि काठिण्यपातळी उच्च असलेला होता. परंतु, आरसीसीच्या तज्ज्ञ प्राध्यापकांच्या योग्य मार्गदर्शन आणि प्रभावी अध्यापन पद्धतीने काठिण्यपातळीलाही छेद देत दैदिप्यमान यश प्राप्त केले आहे. आरसीसीचा मराठवाड्यात अव्वल तर संपूर्ण महाराष्ट्रात बल्क मध्ये सर्वाधिक मध्ये यश प्राप्त केले आहे.

एमबीबीएस या उच्च वैद्यकीय शिक्षण प्रवेशासाठी नॅशनल टेस्टींग एजन्सी अर्थात एन.टी.ए.च्या वतीने नीट परीक्षा घेतली जाते. याच परिक्षेत मिळालेल्या गुणांनुसार डॉक्टर बनण्याचे स्वप्न पाहणाऱ्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावरील सर्वोच्च वैद्यकीय शिक्षण संस्था असलेल्या एम्ससह नामांकित वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रवेश मिळतो. फिजिक्स, केमेस्ट्री आणि बायोलॉजी या विषयांवर आधारित ७२० गुणांच्या पेपर मध्ये किती गुण मिळतात यावर टॉपच्या वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रवेश निश्चित होत असल्यामुळे नीट मध्ये अधिकाधिक गुण मिळाविण्यासाठी विद्यार्थी हे दिवरात्र अभ्यासरूपी परिश्रम घेतात.





दरम्यान, मागील दोन दशकांपेक्षा अधिक काळापासून आतापर्यंत हजारो डॉक्टर घडविणारी शैक्षणिक संस्था म्हणून प्रा. मोटेगावकर सर संचलित आरसीसीचा नावलौकिक आहे. स्वत: प्रा. मोटेगावकर सर हे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात याशिवाय विविध विषय आणि विषयातील घटकांनुसार तज्ज्ञ प्राध्यापक हे याठिकाणी अध्यापनाचे कार्य करतात.



विद्यार्थ्यांना सहज अनब सोप्या पद्धतीने अभ्यासक्रम लक्षात राहिलं, परिक्षेच्या कालावधीत विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम निर्माण होणार नाही याची पुरेपूर काळजी आरसीसीमध्ये घेतली जाते, याच कारणामुळे संस्थेने आतापर्यंत हजारो डॉक्टर दिले आहे. दरम्यान, नीट-२०२५ परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. यामध्ये आरसीसी पॅटर्नचा निकाला हा मराठवाड्यात अव्वल तर ठरलाच याशिवाय बल्क निकालातही आरसीसीने संपूर्ण महाराष्ट्रात आपल्या गुणवत्तेची छाप सोडली आहे. यामध्ये ५५० पेक्षा अधिक गुण घेणारे ७२ विद्यार्थी तर ५०० पेक्षा अधिक गुण घेणारे ३६३ विद्यार्थी हे आरसीसीचे आहेत. दरम्यान, यंदाच्या नीट-२०२५ चा पेपरची काठिण्यपातळी अधिक होती. मागील वर्षी ज्या विद्यार्थ्याला ७१० गुणाला ऑल इंडिया रँक मिळाला होता तो रँक या वर्षी ५९० गुणांवर आला आहे. त्यामुळे पेपर किती कठिण होता हे समजते. पेपर कठिण असल्यामुळे कट ऑफ कमी आला असल्यामुळे आतापर्यंत हाती आलेल्या निकालानुसार या वर्षी ६०० पेक्षा अधिक गुण घेणारे विद्यार्थी नामांकित वैद्यकीय महाविद्यालात प्रवेश घेण्यास पात्र ठरणार असल्याचे सांगण्यात येत आहे. परंतु, काठिण्यपातळी जरी उच्च असली तरी योग्य मार्गदर्शन, गुणवत्तापूर्ण अध्यापन पद्धती आणि निकालातील सातत्य म्हणजेच प्रा. मोटेगावकर सरांची आरसीसी. तरी आरसीसीच्या प्रत्येक शाखेचा लक्षणीय निकाल लागल्याबद्दल राज्यभरातील पालकांतून समाधान व आनंद व्यक्त केला जात आहे.

आरसीसीचे विद्यार्थी केवळ नीटच नव्हे तर अभियांत्रिकी शिक्षण प्रवेशासाठी आवश्यक असलेल्या जेईई मेन्स, जेईई ॲडवान्स्ड आणि एमएचटी -सीईटी या तीनही प्रवेशपूर्व परिक्षेत आपली गुणवत्ता सिद्ध करतात. यामध्ये जेईई ॲडवान्स्डमध्ये २६०१ ऑल इंडिया रँक खुल्या गटातून मिळवला. सीईटी (पी.सी.एम. ग्रुप) मध्ये समर्थ फरतडे याने ९९.९१ परसेंटाईल गुण मिळिवले. सीईटी (पी.सी.बी.) मध्ये आदिनाथ कुरूडे याने १०० परसेंटाईल मिळिवले. शिवाय इंजिनियरिंग ग्रुप साठी ९९ पर्सेंटाईलच्या पुढे गुण मिळिवणारे १४ तर ९५ पर्सेंटाईलच्या पुढे गुण मिळिवणारे ५२ विद्यार्थी हे आरसीसीचे आहेत.

सगळेच विद्यार्थी दोन वर्षांपासून आरसीसी मध्ये शिक्षण घेत होते. एम्स बॅच, अर्जुना बॅच, सुपर नोव्हा या अत्यंत कमी विद्यार्थी संख्या असलेल्या बॅच मधून या विद्यार्थ्यांनी अध्यापन करण्यात आले. या सर्व बॅचेस मधून चांगला निकाल लागला. २३ जून पासून ११ वी नवीन बॅच व नीट रिपिटर बॅच सुरू होणार असून यामध्ये नीट मध्ये ४०० पेक्षा अधिक गुण मिळिवलेल्या होतकरू विद्यार्थ्यांना व ११ आरसीसी च्या जुन्या विद्यार्थ्यांना फिस मध्ये विशेष सवलत देण्यात येणार आहे असे संयोजकांनी सांगितले .



## शेतकऱ्यांच्या मुलांसाठी वस्तीगृहाला विरोध; ‘शेतकरी स्टाईल’ने उत्तर देऊ - शिवाजीराव साळुंखे यांचा इशारा

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

शेतकऱ्यांच्या मुलांच्या उच्च शिक्षणाच्या सोयीसाठी छत्रपती संभाजीनगर बाजार समितीच्या जागेवर उभारण्यात येणाऱ्या वस्तीगृह प्रकल्पाला काही व्यापारीधार्जिण्या गटांकडून विरोध केला जात आहे. हा विरोध अन्यायकारक, शेतकरीद्वेष्ट्या मानसिकतेतून प्रेरित असून, शेतकरी समाजाच्या भावी पिढीच्या प्रगतीवर गदा आणणारा असल्याची तीव्र प्रतिक्रिया अखिल भारतीय बळीराजा शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष शिवाजीराव साळुंखे पाटील यांनी व्यक्त केली आहे.

हा प्रकल्प केवळ वस्तीगृहासाठी नसून, तो शेतकऱ्यांच्या मुलांच्या उज्ज्वल भवितव्याचा आधार आहे. शेतकरी समाज शिक्षणाच्या बाबतीत मागे राहू नये, यासाठी आम्ही ही योजना राबवत आहोत. मात्र काही स्वार्थी गट हेतुपुरस्सर विरोध करून या प्रकल्पावर पाणी फेरत आहेत. हे षड्यंत्र आम्ही खपवून घेणार नाही,ङ्ग असा इशारा त्यांनी दिला.

साळुंखे पुढे म्हणाले, ङ्गशेतकऱ्यांनी आपल्या कष्टाच्या घामातून बाजार समित्या उभारल्या. व्यापाऱ्यांनी त्या माध्यमातून मोठे उत्पन्न मिळवले, आज त्याच व्यापाऱ्यांच्या गटांकडून शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षणापासून दूर ठेवण्याचा प्रयत्न होतो आहे, ही बाब अत्यंत लज्जास्पद आहे.

जो कोणी या वस्तीगृह प्रकल्पाला विरोध करेल, त्याला आम्ही ‘शेतकरी स्टाईल’ने उत्तर देऊ. आमच्या मुलांच्या शिक्षणाशी कोणी खेळ केला, तर आम्ही गप्प बसणार नाही. आमचा लढा शांततेत असला तरी त्यामागे आमची अस्मिता आणि भवितव्याचा मुद्दा आहे, असा थेट इशारा त्यांनी दिला. या संपूर्ण प्रकरणात बाजार समिती आणि सहकार विभागाने तातडीने हस्तक्षेप करून विरोध करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करावी, अशी मागणीही साळुंखे यांनी केली. अन्यथा शेतकरी रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडतील, असा सज्जड इशाराही त्यांनी दिला.

या घडामोडीमुळे शेतकरी वर्गात तीव्र नाराजी निर्माण झाली असून, या संघर्षाला आता समाजातील विविध घटकांचा सक्रिय पाठिंबाही मिळू लागला आहे. शेतकऱ्यांच्या हक्काच्या शिक्षणासाठी सुरू असलेला हा लढा व्यापक रूप धारण करत असल्याचे स्पष्ट होत आहे.

## अखिल भारतीय बळीराजा शेतकरी संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी पंडित कदम यांची नियुक्ती

छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) अखिल भारतीय बळीराजा शेतकरी संघटना महाराष्ट्र राज्य च्या जिल्हाध्यक्षपदी वैजापूर येथील पंडित कदम यांची नियुक्ती करण्यात आली आहे संघटनेचे संस्थापक अध्यक्ष शिवाजीराव साळुंखे पाटील यांनी ही नियुक्ती केली आहे आज शुक्रवारी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती डॉ. राधाकिसन पठाडे यांच्या हस्ते श्री कदम यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी बोलताना अखिल भारतीय बळीराजा शेतकरी संघटनेच्या संस्थापक अध्यक्ष शिवाजीराव साळुंखे पाटील म्हणाले संघटनेचे महाराष्ट्रभर जाळे पसरण्यात येत आहे शेतकरी वर्गांचा मोठा प्रतिसाद मिळत असून विशेषता तरुण वर्ग संघटनेकडे आकर्षित होत आहे आज छत्रपती संभाजी नगरच्या जिल्हाध्यक्षपदी श्री. कदम यांची नियुक्ती करण्यात आली आहे लवकरच संघटनेचा मोठ्या प्रमाणावर विस्तार करण्यात येणार असून प्रादेशाध्यक्षपदी सक्रिय आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नाची जाण असलेल्या कार्यकर्त्याची निवड केली जाणार आहे प्रत्येक जिल्ह्याम ध्ये जिल्हाध्यक्ष निवड करून त्यानंतर तालुका अध्यक्ष आणि शाखा अध्यक्षांची नियुक्ती करण्यात येणार आहे शेतकऱ्यांचे प्रलंबित प्रश्न आणि सध्या भेडसवणाऱ्या समस्या बाबत शासन स्तरावर पाठपुरावा करून शेतकऱ्यांचा आर्थिक स्तर सुधारण्यासाठी शासन स्तरावर प्रयत्न केले जाईल वेळप्रसंगी शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी सरकारच्या विरोधात आंदोलन छेडण्यात ची वेळ आली तर संघटना मागेपुढे पाहणार नाही असेही शिवाजीराव साळुंखे पाटील म्हणाले

